# ग्लोबल महातेज

१ रु. स्वागत मूल्य

अमळनेर | वर्ष १ ले | अंक : ६ | शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ | https://epaper.globalmahatej.com/ | पाने : ४ | किंमत : 1 रु. | Email - globalmahatej@gmail.com


### दिनविशेष
२७ सप्टेंबर

- १९१० : स्वदेशभिमानी रामकृष्ण पिल्लई या भारतीय पत्रकाराला त्रावणकोर सरकारवर टीका केल्याबद्दल अटक करून हद्दपार करण्यात आले होते.
- १९९० : रंगनाथ मिश्रा यांनी भारताचे २१ वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.
- १९३१ : सुप्रसिद्ध क्रिकेटपटू दिवंगत विजय मांजरेकर या भारतीय क्रिकेट खेळाडू यांचा जन्म दिवस.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

### दूषित पाण्याबाबतच्या ‘ ग्लोबल महातेज ’च्या बातमीचा दणका...!

# संतप्त जनभावनांची आमदारांनी घेतली तत्काळ दखल!

## पालिकेतर्फे युद्धपातळीवर गळक्या, फुटक्या जलवाहिन्या दुरूस्तीचे काम सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील विविध कॉलन्या तसेच पैलाड, ओंकारनगर, तांबेपुरा, शनी मंदिर, साने नगर परिसरातील दूषित पाणीपुरवठ्याबाबत ग्लोबल महातेजने पालिका पाजतेय गढूळ पाणी..! या मथळ्याखाली गुरूवार (ता. २५) रोजी बातमी प्रकाशित केली होती. याची दखल घेत तसेच जनतेच्या संतप्त भावना लक्षात घेऊन आमदार अनिलदादा पाटील यांनी पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना यावर युद्धपातळीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले. आमदारांनी चक्क दूषित पाण्याचा नमुनाच पालिकेत भेट स्वरूप पाठविला. परिणामी पालिका प्रशासनाने याबाबत तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत.


पालिका पाजतेय गढूळ पाणी..!

पैलाड, ओंकारनगर परिसरातील आजची सत्य स्थिती...!!

नगर परिषदेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संताप

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहरातील पैलाड, ओंकारनगर, शनी मंदिर परिसरात गाळ मिश्रित पाणीपुरवठा होत असल्याने या परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्याच्या अनेक समस्या सुरू झाल्याची तक्रार परिसरातील नागरिकांनी केली आहे.

काहींना साथीच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. पालिका प्रशासन याकडे गंभीरतेने लक्ष न देता साफ दुर्लक्ष करीत आहे, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. शहरात गाळमिश्रित पाणीपुरवठा होत असल्याने ‘ मोठ्या प्रमाणावर रोगराई पसरत असल्याचे यापूर्वीही समता कॉलनी, तांबेपुरा व ख्वाजानगर परिसरातील नागरिकांनी नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांना पत्र देऊन कळविले आहे. मात्र त्यावरही अद्याप कोणतीही समाधानकारक कार्यवाही झाल्याचे दिसत नसल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे. २५ सप्टेंबर रोजी रोजी पैलाड, ओंकारनगर, शनीपेठ भागात अत्यंत गढूळ पाणीपुरवठा झाला. याबाबत संबंधितांशी संपर्क साधला असता सध्या परतीचा पाऊस बरसत असल्याने असे होत आहे. पाणी गाळून प्यावे, तुरटी वापरावी, असा ‘ वैद्यकीय’ सल्ला देण्यात आला. जर आपल्याकडे अत्याधुनिक फिल्टर प्लांट आहे तर गाळमिश्रित पाणीपुरवठा का होतो? अधिकारी व कर्मचारी यांचे दुर्लक्ष होत आहे का? साथीच्या आजारांमुळे रुग्णालये भरली आहेत. पालिकेने तत्काळ प्रभावी व कायम स्वरूपी उपाययोजना करावी अशी जोरदार मागणी होत आहे.

**दै. ग्लोबल महातेजच्या अंकात गुरुवारी प्रसिद्ध झालेली बातमी.**

शहरातील विविध कॉलन्या, पैलाड, ओंकारनगर, शनी मंदिर, तांबेपुरा, साने नगर परिसरात गाळ मिश्रित दूषित पाणीपुरवठा होत असल्याने या परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्याच्या अनेक समस्या सुरू झाल्याची तक्रार परिसरातील नागरिकांनी ग्लोबल महातेजकडे केल्या होत्या.

दूषित पाण्याच्या समस्येकडे पालिकेचे लक्ष वेधण्यासाठी अनेकांनी थेट पालिकेत धडक मोर्चा काढण्याचीही तयारी दाखवली होती. काही माजी व इच्छुक नगरसेवकांनीही ग्लोबल महातेजला बातमी प्रकाशित करून या समस्येला वाचा फोडण्याची विनंती केली होती. त्यांनीही आंदोलनासाठी वातावरणनिर्मिती सुरू केली होती. मात्र, शुक्रवारी ग्लोबल महातेज प्रसिद्ध झाला. त्यात दूषित पाण्यासंदर्भातील धक्कादायक व भयावह स्थितीचे सविस्तर वर्णन करण्यात आले होते.

दरम्यान, आमदार अनिलदादा पाटील यांच्या घराजवळच राहणारे त्यांचे कार्यकर्ते तथा ख्यातनाक गायक शरद सोनवणे यांनी सकाळीसच अत्यंत घाणेरड्या पाण्याची बाटली घेऊन थेट आमदारांचे निवासस्थान गाठले. श्री. सोनवणे यांच्या मुलाला दूषित पाण्यामुळे त्रास झाल्याने त्यास रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. श्री. सोनवणे यांनी आणलेली दूषित पाण्याची बाटली पाहून आमदारांनाही धक्का बसला. शहरात सर्वत्र हीच स्थिती असल्याचे बातमीतून सर्वांना कळालेच होते. पालिका वर्तुळातही ग्लोबल महातेजच्या बातमीमुळे चांगलीच खळबळ माजली होती. त्यातच आमदारांचा प्रभावी डोस मिळाल्याने पालिकेने ज्या- ज्या भागातून दूषित पाण्याच्या तक्रारी आल्या होत्या त्या- त्या ठिकाणी कर्मचारी पाठवून फुटक्या व गळक्या जलवाहिन्या दुरूस्त करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले.


(छायाचित्र : शरद कुलकर्णी)

दरम्यान, सडेतोड लिखाण व विविध ज्वलंत समस्यांची प्रभावी मांडणी करत अससल्याबद्दल अनेकांनी ग्लोबल महातेजचे कौतुक करून भविष्यातही अशीच कणखर व निष्पक्ष भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे.

# अरे बापरे...सोन्याचे दर दोन लाखांच्याही वर जाण्याचे संकेत!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सोने हा असा धातू आहे, की ज्याची चकाकी समाजातील प्रत्येक घटकाला आवडते. अनेक जण दागिन्यांचे शौकिन असतात. त्यामुळे ते मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी करतात, तर अनेकांना पिढ्यांपिढ्या सोने ही सर्वात सुरक्षित गुंतवणूक वाटते. त्यामुळेही ते सोन्याचे बिस्किट किंवा तुकडे व वेठ सातत्यपूर्ण खरेदी करतात. अर्थात सोने खरेदी करणे हा कधीही गरिबांच्या अवाक्यातील प्रकार नव्हता व नाही. मध्यमवर्गीय मंडळीही लग्न प्रसंग किंवा कधी तरी कोणत्या तरी निमित्ताने हातात दोन पैसे असले तर सणावळाला सोने खरेदी करतात किंवा छोटा मोठा दागिना घडवितात. अशी ही सोन्याची चमकदार कहाणी आहे. गेल्या काही वर्षात सोन्याचे दर झपाट्याने वाढत आहेत. आता तर ते लाखापार गेले आहेत. सोने कधी लाखापार जाईल असे सहसा कोणाला वाटत नव्हते. आता तर ते प्रति दहा ग्रॅम दोन लाखापर्यंत जाण्याचे विश्वसनीय सत्रांचे संकेत आहेत.

जाणकारांनी दिलेल्या माहितीप्रमाणे येत्या पाच वर्षात दहा ग्रॅम सोन्याचा भाव दोन लाख रूपयांवर जाऊ शकतो. पाच वर्षांपूर्वी म्हणजे सप्टेंबर २०२० मध्ये एमसीएक्सवर २४ कॅरेट सोन्याची किंमत प्रति १० ग्रॅम ५१ हजार ६१९ रूपये होती आणि आता ती १ लाख ९ हजार ३८८ रूपये झाली आहे. एका वर्षापूर्वी, हा दर ७२ हजार ८७४ रूपये होता. अशा परिस्थितीत, गेल्या एक वर्षात सोन्याच्या किंमतीत ५० वाढ झाली आहे. गेल्या पाच वर्षात त्यात ११२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. दुसऱ्या बाजूला गेल्या वर्षांपासून सोन्याच्या किंमतीमध्ये ४३ टक्क्यांनी वाढ झाली असून, चांदीन ३७ टक्केपेक्षा जास्त परतावा दिला आहे.



या वर्षाच्या दिवाळीला एक महिन्यापेक्षा कमी वेळ आहे. गेल्या दिवाळीपेक्षा सोने आणि चांदीच्या किंमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. दोन्ही मौल्यवान धातूंनी गुंतवणुकदारांना ४३ टक्क्यांपर्यंतचा चांगला परतावा दिला आहे. २० ऑक्टोबरला प्रति १० ग्रॅम ७९ हजार ६८१ रूपये असलेली २४ कॅरेट सोन्याची किंमत आता प्रति १० ग्रॅम १ लाख १४ हजार ३१४ रूपये झाली आहे. अशाप्रकारे गेल्या दिवाळीपासून सोन्याच्या किंमतीत ४३. ४६ टक्क्यांनी वाढ झाली.

२२ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत मागील दिवाळीतील ७२ हजार ९८८ रूपयांवरून प्रति १० ग्रॅम १ लाख ४ हजार ७१२ रूपयांपर्यंत वाढली. दरम्यान, १८ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमच्या किंमतीत वाढ होऊन ती ५९ हजार ७६१ रूपये झाली आहे. सोन्यासोबतच चांदीच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. गेल्या दिवाळीपासून चांदीच्या किंमती ३७. ५५ टक्क्यांनी वाढून ९८ हजार ३४० रूपये प्रति किलोवरून १ लाख ३५ हजार २६७ रूपये प्रति किलो झाली आहे. मग मंडळी काय विचार केला ? केव्हा चलतात पोते भरून भरून सोने- चांदी घ्यायला???


श्री मंगळग्रह मंदिरात स्कंदमाताच्या रुपात सजविलेली श्री भूमीमातेची विलोभनीय मूर्ती.



अमळनेर : ज्येष्ठ अभिनेते प्रा. योगेश सोमण यांनी शुक्रवारी श्री मंगळग्रह मंदिराला भेट दिली. त्यांचे श्री मंगळग्रह देवाची प्रतिमा देऊन यथोचित सत्कार करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर. शेजारी मराठी वाङ्‌मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, उपाध्यक्ष प्रा. श्यामकांत भदाणे, कार्यवाह नरेंद्र निकुंभ, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, बाळा पवार, निलेश महाजन. (छायाचित्रे : नितेश बारी)

# श्री मंगळग्रह मंदिरात अनुभवली सकारात्मक ऊर्जा

## ज्येष्ठ अभिनेते प्रा. योगेश सोमण यांची मंदिराला भेटीप्रसंगी भावना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : “ मराठी वाङःमय मंडळातर्फे आयोजित शहरातील व्याख्यानाच्या निमित्ताने शुक्रवारी श्री मंगळग्रह मंदिरात येणे झाले. अनुभवांच्या पलीकडे जे असते त्याला आपण अनुभूती म्हणतो. मी स्वतः गेली २५ वर्षे आध्यात्मिक साधना करीत असल्याने या गोष्टी मला मंदिरांमध्ये प्राधान्याने जाणवतात. अनेक मंदिरांमध्ये तेथील व्यवस्थापकीय मंडळाच्या मर्जीनुसार काही नियम पाळावे लागतात. मात्र श्री मंगळग्रह मंदिरात प्रवेशद्वारापासूनच मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत सकारात्मक ऊर्जेची प्रचिती आली. गाभाऱ्यात गेल्यावर मी पुरुषसूक्त व स्त्रीसूक्त यांचे आवर्तन केले. गाभाऱ्यात गेल्यावर मला सकारात्मक ऊर्जा प्राप्त झाली खरे म्हणजे अशी ऊर्जा सर्वांच्या भाग्यात नसते. माझे काहीतरी भाग्य असल्यानेच मलाही सकारात्मकता ऊर्जा अनुभवायला मिळाली. याचे मला मोठे समाधान आहे”, अशी भावपूर्ण प्रतिक्रिया हरहुन्नरी नाट्यदिग्दर्शक, लेखक, चतुरस्त्र अभिनेते व सोनी चॅनलवरील वरील क्राइम पेट्रोल या मालिकेतील अतिशय शिस्तप्रिय इन्स्पेक्टरची भूमिका साकारणारे प्रा. योगेश सोमण यांनी दिली.


**मंदिरातील गाभाऱ्यात पुरुषसूक्त व स्त्रीसूक्त यांचे आवर्तन करताना प्रा. योगेश सोमण.**

याप्रसंगी मराठी वाङ्‌मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, उपाध्यक्ष प्रा. श्यामकांत भदाणे, कार्यवाह नरेंद्र निकुंभ, मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, बाळा पवार, निलेश महाजन यांच्यासह

**पान ३ वर...**


## ॥ नवदुर्गेंचे आजचे रूप ॥

## कात्यायनी

आश्विन शु. १ प्रतिपदा ते आश्विन शु. ९ हा काळ शक्ती पूजनाचा अर्थात शारदीय नवरात्र म्हणून लोकप्रिय सण आहे. या नऊ दिवसांत दुर्गेच्या ९ रूपांची पूजा केली जाते. यात दुर्गेची ९ नामाभिधान आहेत.

श्रीमद्‌भागवतात या भगवतीचे कात्यायनी व्रत श्रीकृष्णाला प्राप्त करण्यासाठी गोपींनी केले होते. अशी मान्यता आहे की, ज्या मुलींचे लग्न जमत नसेल त्यांनी ही उपासना करावी. त्यामुळे कात्यायनी व्रताच्या अनेक अविवाहित मुली उपासना कर्त्या आहेत.

फूल माळा : कर्दळी, चाफा
नैवेद्य : दही, मध
रंग : राखाडी




ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क

शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678

रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# शाही घराण्याचे खाण्याचे अजब वांधे, खात नाहीत ते लसुण आणि कच्चे कांदे

ब्रिटीशांनी भारतीयांवर दीडशे वर्ष राज्य केले. त्याकाळात त्यांनी भारतीयांवर भरपूर जुलूम व अत्याचार केले. असे असले तरी त्यांच्या लाईफ स्टाईलचे आकर्षण भारतीयांना तेव्हाही होते आणि आताही आहेच.

ब्रिटीश शाही राजघराण्याची एक अजब प्रथा आपणास माहित आहे काय? ब्रिटीश शाही घराणे म्हणजे ' उँचे लोग उँची पसंद ' त्यांच्या लाईफस्टाईल सर्वसामान्य लोकांपेक्षा एकदम हटके असतात. त्यातील एक प्रकार म्हणजे ब्रिटीश शाही राजघराण्याच्या स्वयंपाकघरात कोणताही पदार्थ बनवितांना कधीही लसुणाचा वापर केला जात नाही. विशेष म्हणजे देशी व परदेशी पाहुण्यांसाठीही आयोजित भोजनातही लसुणाचा वापर केला जात नाही. तसेच कच्चे कांदेही खाणे ते आवर्जुन टाळतात. त्यांच्या सलादमध्ये कधीही कांदे नसतात.

साधारणतः अनेक धर्म व पंथ कांदे व लसुण तामसी पदार्थ असल्याने ते खात नाहीत. मात्र ब्रिटीश राजघराण्यांचे स्वयंपाकात लसुण व जेवतांना कच्चे कांदे न खाण्याची कारणे वेगळी आहेत. ही मंडळी सर्रास सर्व प्रकारचे मांसाहारी पदार्थ खातात. त्यामुळे कांदे व लसुण तामसी असल्यामुळे ते खात नाहीत. असे कारण होऊ शकत नाही. पिढ्यांपिढया ब्रिटीश राजघराण्यांमध्ये कांदे व लसुण न खाण्याची पद्धत सुरू आहे. त्यांच्या यापद्धतीला ' रॉयल स्टाईल ' असेही म्हटले जाते. जेव्हा ब्रिटनच्या शाही राजघराण्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी शाही भोजन आयोजित केले, तेव्हाही कोणत्याही पदार्थामध्ये लसणाचा वापर केलेला नव्हता.

**चला जाणून घेऊयात कारणे :**

**श्वासाची दुर्गंधी:**

हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. शाही कुटुंबातील व्यक्तींना अनेकदा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये, परदेशी पाहुण्यांसोबत आणि विविध मान्यवरांसोबत भेटायचे असते. कच्चा कांदा व पदार्थातील लसूण खाल्ल्यानंतर येणारा तीव्र वास असभ्य किंवा अनादरणीय मानला जाऊ नये म्हणून ते कच्चे कांदे व पदार्थामध्ये व लसूण युक्त पदार्थ खाणे टाळतात.



खुद्द राणी कॅमिला यांनी एका कार्यक्रमात याची पुष्टी केली होती की, त्यांच्या घराण्यात कधीही लसूण युक्त पदार्थ व कच्च्या कांद्यांचा भोजनात वापर केला जात नाही. राणी एलिझाबेथ द्वितीय यांची नापसंती: दिवंगत राणी एलिझाबेथ द्वितीय यांना वैयक्तिकरित्या लसूण आणि कांदे यासारखे तीव्र वास असणारे पदार्थ आवडत नव्हते. त्यामुळे त्यांच्या जेवणाच्या मेन्यूमधून हे पदार्थ वगळले जात असत. त्यांच्यासोबत जेवताना इतर सदस्यही ते टाळत असत. थोडक्यात, सामाजिक शिष्टाचार पाळणे आणि महत्त्वाच्या भेटींमध्ये श्वासाची दुर्गंधी नको यासाठी राजघराण्यातील सदस्य लसूण खाणे टाळतात.

## किस्से दिग्गजांचे

### स्व. बाळासाहेब ठाकरे आणि पत्रकार

एकदा पत्रकारांनी बाळासाहेबांना विचारले "साहेब, तुम्हाला मुख्यमंत्री व्हायचं आहे का?" बाळासाहेब लगेच म्हणाले "मला मुख्यमंत्री व्हायचं असतं, तर मी आधीच झालो असतो. सिंह स्वतः शिकारीला जातो, गवत खायला नाही!" सर्वजण केवळ हसलेच नाही तर सर्वांनी जोरदार टाळ्याही वाजविल्या.

### राज ठाकरेंची स्टाईलच भारी

एकदा राज ठाकरे यांना एकाने विचारले की, "तुम्ही सतत फोटोग्राफी, नाटक चित्रपट, कार्टूनबद्दल बोलता. राजकारणाबद्दल कमी बोलता." त्यावर ते म्हणाले , राजकारण हेच महाराष्ट्रातील सर्वात मोठे नाटक आहे. मला त्याचा दिग्दर्शक व्हायचे आहे. त्यामुळे नाटकावर बोलावेच लागते. प्रश्न विचारणाऱ्याने राज ठाकरे यांच्या मिस्कील हजरजबाबीपणाला कोपरापासून हात जोडले.

# निमकारोली बाबांच्या भूमिकेत सुबोध भावे

नैनीताल जवळ असलेल्या कैचीधाम येथील सुप्रसिद्ध हनुमानभक्त निमकरोली बाबा जगतविख्यात झाले आहेत. अनेक जण त्यांना श्री हनूमानाचा अवतार मानतात. निमकरोली बाबांच्या दिव्य चमत्कारांच्या व साक्षात भेटीतून आलेल्या अविश्वसनीय अनुभूतिंचे अनेक किस्से आहेत. दिवसेंदिवस त्यांच्या भक्तांच्या संख्येमध्ये कमालीची वाढ होत आहे. कोणत्याही क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तीवर चित्रपट किंवा मालिका काढली तर ती हमखास लोकप्रिय होते. हा फंडा मनोरंजन क्षेत्रातील निर्मात्यांना चांगला माहित आहे. त्यामुळेच त्यांनी हल्ली ज्यांच्या नावाचा खूप बोलबाला आहे. त्या निमकरोली बाबांवर बायोपिक तयार करण्याचे काम सुरू केले आहे. बाबांच्या चेहऱ्याशी व अंग काठीशी सुबोध भावे यांचे व्यक्तीमत्व मिळते जुळते आहे. त्यामुळेच बाबांच्या भुमिकेत सुबोधची निवड करण्यात आली आहे.

अनेक बायोपिक मधून लोकांच्या पसंतीस उतरलेला अभिनेता म्हणजे सुबोध भावे. सुबोध आता एतिहासिक बायोपिक मध्ये नाहीतर धार्मिक बायोपिक मध्ये दिसणार आहे. प्रसिद्ध निमकरोली बाबा यांच्या आयुष्यावर हा सिनेमा आहे. या सिनेमाचे पोस्टर नुकतेच सुबोधने सोशल मीडियावर शेअर केले आहे. श्री बाबा निमकरोल असे या बायोपिकचे नाव आहे. हा हिंदी सिनेमा आहे. या पोस्टरमध्ये सुबोध बाबांच्या लुक मध्ये दिसत आहे. छोटे केस, दाढी अंगाभोवती घोंगडी घेतलेला सुबोध उभे उभ निमकरोली बाबांसारखाच दिसतो आहे. लखनौमध्ये आगामी बाबा निमकरोली यांच्या आयुष्यावरील हिंदी चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण झाले. निमकरोली बाबांची भुमिका करणे हे माझे परम भाग्य असल्याचे मत सुबोधने व्यक्त केले.




# सूर्यकुमार यादववर पाकिस्तानने कारवाईची का केली होती मागणी?

भारत-पाकिस्तान सामन्यातील विजयानंतर सूर्यकुमार यादवने वक्तव्य केले होते, की हा विजय 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी असलेल्या भारतीय सशस्त्र दलांना समर्पित केला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांच्या कुटुंबियांप्रति त्याने सहानुभूतीही व्यक्त केली होती. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने या वक्तव्याला 'राजकीय' मानून ते खेळाच्या प्रतिमेला नुकसान पोहोचवणारे असल्याचे सांगत आयसीसीकडे औपचारिक तक्रार केली होती.

**आयसीसीची कार्यवाही आणि निर्णय:**

आयसीसीचे सामनाधिकारी रिची रिचर्डसन यांनी या प्रकरणाची सुनावणी केली. सूर्यकुमार यादवने आपल्यावर लावलेले आरोप अमान्य करत 'दोषी नसल्याचे' सांगितले. आयसीसीच्या आचारसंहितेनुसार, हे प्रकरण लेव्हल-१ उल्लंघनाचे मानले गेले आहे. लेव्हल-१ उल्लंघनामध्ये सहसा खेळाडूवर बंदी घातली जात नाही. आयसीसीने सूर्यकुमार यादवला केवळ औपचारिक ताकीद दिली आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांसाठी सामना शुल्काचा दंड किंवा डिमेरिट पॉइंट्स दिले जाऊ शकतात, पण त्याला फायनल खेळण्यास बंदी घालण्यात आलेली नाही. त्यामुळे सूर्यकुमार यादव आशिया कपची फायनल खेळू शकणार आहे.




# फिटनेस वे ऑफ लाईफ

## सन २००० मध्ये मिस युनिव्हर्स ठरलेली अभिनेत्री लारा दत्ता सांगतेय आपल्या फिटनेसबद्दल



**फिटनेसला अधिक महत्त्व**

मिटनेसच्या बाबतीत लारा खूप मेहनत घेते. शालेय जीवनात ती खूप चिवट होती. त्यामुळे तिचे शरीर देखील ॲथलेटिक आहे. तिच्या करिअरच्या सुरुवातीपासून पाहिले असेल, फिटनेस हाच तिच्यासाठी जगण्याचा मार्ग व नैसर्गिक आनंद होता व आहे. जीवनाकडे ती समग्र दृष्टिकोनातून पाहते. त्यामुळे ती खान-पानावर विशेष लक्ष देते. तिला अनेकांनी विचारले होते की, बाळंतपणानंतर वजन कसे कंट्रोल ठेवशील? स्वतःला पूर्वी इतकेच कसे फिट ॲण्ड नीट ठेवशील?

**योगा, जिम व कार्डिओ तिन्हींना प्राधान्य**

प्रश्नकर्त्यांना लाराने प्रत्यक्ष कृतीतून उत्तर दिले. तिने योगा, जिम व कार्डिओ या तिन्ही व्यायामांच्या प्रकारांवर विशेषभर दिला. लारा जास्त वेट ट्रेनिंग करीत नाही, मात्र लिफ्ट ट्रेनिंग, क्रॉस फिट करते. लाराच्या मते फिटनेससाठी भरपूर महागड्या जिममध्ये मेंबरशिप घ्यायची गरज नाही. तसेच खासगी ट्रेनरकडूनच प्रशिक्षण घ्यायला पाहिजे, असेही नसते. त्याऐवजी तुम्हाला पेलवेल इतके पायी चाला, धावा मनसोक्त नृत्यही करा. हे करताना पायात विशिष्ट प्रकारचे बुट घालावयास मात्र विसरू नका. अनेक जण चुकीची पादत्राणे घालतात त्यामुळे त्यांचे चालणे आणि धावणे यातून त्यांच्या शरीराला लाभ होण्या ऐवजी नुकसानच होते. महिला व्यायामच्या बाबतीत फारशा गंभीर नसतात. हे गैर आहे खरेतर व्यायामासाठी महिलांकडे खूप पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे तुम्हाला जे आवडते, ते तुम्ही करू शकता.

**रिसर्च करा**

लारा म्हणते की, मी शरीराला पोषक तत्वे देणारे व्हिटॅमिनस् घेतले आहेत. मात्र सप्लिमेंट कधीच घेतलेल्या नाहीत. स्टेरॉईडच्या नादी तर कधीच लागली नाही. अनेक जण सुडोल शरीर, पोटावर ॲब्ज यासाठी अंधपणे सप्लीमेंट व स्टीरॉईडस् घेतात. भविष्यात त्यामुळे त्यांना अनेक गंभीर आजार व दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. सदृढ शरिरासाठी आपली पुर्वज ज्या पद्धतीने जीवन शैली अंगीकारत होते. तीच पद्धत आजही योग्य आहे. फिटनेस राखण्याचा छंद असणे कधीही चांगलेच आहे. मात्र बॉडीबिल्डर बनण्याच्या नादात शरीराचा सत्यानाश करून घेणे निश्चितच गैर आहे.

**चमकदार चेहऱ्यासाठी नियमित व्यायाम आवश्यक**

चेहऱ्यावर जर तुम्हाला सर्वांना पटकन आकर्षित करेल अशी चमक हवी असेल तर त्यासाठी रासायनिक क्रिम्स् तथा खूप महागड्या ट्रिटमेंटस् घेण्याची गरज नाही. त्यासाठी लवकर झोपा. पुरेशी झोप घ्या. लवकर उठा. नियमित योग प्राणायाम करा. भरपूर पाणी प्या. जंकफूड अजिबात खाऊ नका. सात्विक आहारावर विशेष भर द्या. आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे नियमित व्यायाम करा. कोणत्याही परिस्थितीत स्वतःला आनंदी व सकारात्मक ठेवा. नैसर्गिक पदार्थांचे लेप नियमितपणे चेहऱ्यावर लावा. केमिकल्सचा वापर करू नका. यामुळे निश्चितपणे आपला चेहरा अत्यंत परिणामकारक व चमकदार दिसेल.

**असा असतो लाराचा आहार**

लारा अंत्यंत संतुलित आहार घेते. विशेष म्हणजे तिने ज्या दिवशी जसा वर्कआऊट केलेला असतो त्याप्रमाणे तिचा आहार असतो. लाराच्या मते प्रत्येकासाठी ब्रेकफास्ट ( न्याहारी ) अत्यावश्यक आहे. आपण जर शाकाहारी असाल तर भिजविलेले ड्रायफ्रूटस्, फॅट विरहित, न तळलेले हलके पदार्थ खावेत. एखादे फळ व नारळ पाणी घ्यावे. लारा न्याहरीत यासोबत अंडे ही खाते. रोजच्या भोजनातही दमदार मात्र पोटासाठी हलके फुलके व वेळेत भोजन करते.

# मणिबेन दूध विकून कमावतात १.९४ करोड

हिमालय सुद्धा मजबूत इरादे असलेल्या माणसाला हलवू शकत नाही. ही गोष्ट गुजरातच्या एक महिलेने सिद्ध करुन दाखवलीय. फक्त शिक्षण किंवा मोठी नोकरी करुन तुम्ही कोट्यवधी रुपये कमवू शकत नाहीत, हे सुद्धा मणिबेनने सिद्ध केलय. जर, तुम्ही कठोर मेहनत करण्यासाठी प्रतिबद्ध असाल, तर कुठल्या हाय-प्रोफाईल नोकरीशिवाय सुद्धा चांगली कमाई करु शकता. तुम्ही मेहनत आणि प्रतिभेच्या जोरावर मोठे यश मिळवू शकता.

ही महिला कुठल्या मल्टीनॅशनल कंपनीत काम करत नाही. तर तिने दूध विकून कोट्यवधी रुपये कमावले आहेत. या महिलेचे नाव मणिबेन जेसुंगभाई चौधरी स्थानीय पटेलवास (कसारा) आहे. मणिबेन बनासकांठा जिल्ह्यात राहते. मणिबेनने सन २०२४-२५ मध्ये १ कोटी ९४ लाख रुपयांचे दूध विकले. आता मणिबेनचे लक्ष्य ३ कोटी रुपयांपर्यंत दूध विक्री करणे आहे. विशेष म्हणजे मणिबेन ६५ वर्षांची आहे. दुग्ध उत्पादक सहकारी समितीला दररोज १ लाख ११०० लीटर दुधाचा पुरवठा करते. मणिबेनने सन २०२४-२५ मध्ये ३ लाख ४७ हजार लीटरपेक्षा जास्त दूधाची विक्री केली. १०० आणखी नवीन म्हशी विकत घेणं हे मणिबेनच लक्ष्य आहे. तिच्या मुलाने सांगितले की, "२०११ मध्ये आमच्याकडे फक्त १० म्हशी आणि १२ गायी होत्या. आता ही संख्या वाढून २३० पेक्षा जास्त झाली आहे. आता आम्हाला १०० आणखी म्हशी विकत घेऊन दूध उत्पादन वाढवायच आहे" आज मणिबेनच्या पशुपालन कार्याशी जवळपास १६ कुटुंब संलग्न आहेत.

## सहकारी क्षेत्रात एक अग्रणी राज्य

मणिबेन आपल्या गायी आणि म्हशींच दूध काढण्यासाठी आधुनिक मशीन्सचा वापर करतात.कुटुंबातील सर्व सदस्य पशूपालनात सक्रीय आहे. आत्मनिर्भर बनण्यासाठी मणिबेन अत्यंत प्रेरणादायी असल्याची पोस्ट नुकतिच गुजरातचे गृहमंत्री हर्ष सांघवी यांनी केली आहे. त्यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटलय की, मणिबेन सारख्या मेहनती नागरिकांमुळेच गुजरात संपूर्ण भारतात सहकारी क्षेत्रात एक अग्रणी राज्य बनलं आहे.

मणिबेन वर्ष २०२४-२५ मध्ये दूध विक्रीच्या बाबतीत जिल्ह्यात दुसऱ्या स्थानावर राहिल्या.

हल्ली नकली दुध विक्रीचे प्रमाण खूप जास्त झाले आहे. अनेक लोकांना कमी श्रमात जास्त पैसा हवा आहे. त्यासाठी ते लोकांच्या जीवाशीही खेळायला कमी करत नाहीत. अशा लोकांनी तसेच नोकरीच्या नादात वर्षानुवर्षे वणवण भटकणाऱ्यांनीही मणिबेनचा आदर्श घेतला पाहिजे. यशस्वी होण्यासाठी बेईमानी करावी लागते हा सोईस्कर व शॉर्टकटच्या विचाराला मणिबेन सारख्या व्यक्ती म्हणजे जोरदार थप्पडच आहे. प्रामाणिक राहून व मेहनत करूनही तुम्ही कोट्याधीश होऊ शकतात. हेच मणिबेनने सिद्ध केले आहे. शुद्ध दुधाचा संपूर्ण देशाला पूरेल ऐवढा पुरवठा करण्यासाठी मणिबेनला आदर्श मानणे गरजेचे आहे.




हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. १७, रामचंद्रनगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) ४२५००२ येथे छापून गट नं. १६०, प्लॉट नं. ५१/५२, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) ४२५४०१ येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. /२५/ ), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : ७०११००४०४०, ७०११००४२४२, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# बदलती आव्हाने स्वीकारून पालकत्वाची भूमिका बजवावी

## इंजि. सुधीरकुमार वाघुळदे व डॉ. राहुलदत्त भोईटे यांचे मत; शारदीय व्याख्यानमालेंतर्गत गुंफले चतुर्थ पुष्प

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आजच्या बदलत्या सामाजिक आणि कौटुंबिक वातावरणात पालकत्वाची भूमिका निभावणे हे एक महत्त्वपूर्ण परंतु आव्हानात्मक काम बनले आहे. मुलांचे योग्य संगोपन करताना पालक मंडळी अनेकदा तणावाखाली येतात. त्यामुळे मुलांवर नको तो परिणाम होतो. त्यासाठी सकारात्मक दृष्टिकोनातून आनंदी पालकत्वाचा स्वीकार करीत त्यादृष्टीने पावले टाकणे अत्यावश्यक आहे, असे मत जळगावातील सुपरिचित समुपदेशक इंजि. सुधीरकुमार वाघुळदे व वरणगाव येथील मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राहुलदत्त भोईटे यांनी व्यक्त केले.

मराठी वाड्:मय मंडळ, आप्पासाहेब प्रा. र. का. केले सार्वजनिक ग्रंथालय व मोफत वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा मंगल कार्यालयात आयोजित शारदीय व्याख्यानमालेंतर्गत गुरुवारी आनंदी पालकत्व ( सकारात्मक दृष्टिकोन ) या विषयावर ते चतुर्थ पुष्प गुंफत होते.

व्यासपीठावर मराठी वाड्:मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, कार्याध्यक्ष बन्सीलाल भागवत, कार्यकारी सदस्य प्रा. डॉ. सुरेश माहेश्वरी, संदीप घोरपडे, अंबिका मंगल कार्यालयाचे संचालक कैलास पाटील, मॅथ्स कोचिंग कार्यालयाचे संचालक किरण माळी उपस्थित होते.

याप्रसंगी इंजि. वाघुळदे व डॉ. भोईटे यांचा मराठी वाड्:मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. जोशी यांनी सत्कार केला. तसेच देणगीदारांचाही सत्कार करण्यात आला.

इंजि. वाघुळदे व डॉ. भोईटे म्हणाले, की सर्व सजीव गोष्टींचे पालकत्व निर्माण करणे यालाच सकारात्मक पालकत्व म्हणता येईल. सकारात्मक पालकत्व म्हणजे मुलांना सकल, सफल आणि संपूर्ण या त्रिसूत्रींच्या आधारे वाढविणे. या पद्धतीत मुलांवर नियंत्रण ठेवण्याऐवजी त्यांच्या भावना समजून घेण्यावर आणि त्यांच्याशी उघडपणे संवाद साधण्यावर प्रामुख्याने भर द्यायला हवा. फक्त शिस्त लावणे नव्हे, तर त्यांना योग्य मार्गदर्शन करत त्यांच्यात आत्मविश्वास, सहकार्य आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करायला हवी. जर ही त्रिसूत्री प्रामाणिकपणे राबविली तर पालकाला कृतार्थता, यथार्थता, आनंद, प्रेम, जिव्हाळा, उच्चप्रतीचे समाधान नक्की मिळेल. साने गुरुजींनी जीवनात उत्तम पालकत्व निभावले. साने गुरुजींच्या मते जी मुले समाजासाठी काहीतरी करतात तीच आदर्श आणि आनंदी असतात. त्यासाठी आनंदी पालकत्वाचा वारसाही असायला हवा. मराठी वाड्:मय मंडळाचे कार्यकारी सदस्य भय्यासाहेब मगर व अजय ट्रॅव्हल्स संचालक तथा स्वीकृत सदस्य अजय केले यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

### पालकांनी मुलांना आधार द्यायला हवा

इंजि. वाघुळदे व डॉ. भोईटे म्हणाले, की आजच्या धकाधकीच्या आणि संघर्षमयी जीवनशैलीत मुलांवर दडपण वाढले आहे. अशा वेळी पालकांनी त्यांना आधार द्यायला हवा. त्यांची मानसिक तयारी करून घ्यायला हवी आणि त्यांच्यात निर्णयक्षमताही वाढवावी आणि हे सर्व फक्त सकारात्मक दृष्टिकोनातूनच शक्य आहे.

पालकत्व हा एक प्रवास असून त्यात फक्त वाढविणे नव्हे तर घडविण्याचाही भाग महत्वाचा आहे. आनंदी पालकत्वासाठी गरज आहे ती सकारात्मक विचारांची, सहनशीलतेची आणि समजूतदारपणाची. अशा पद्धतीने वाढलेली मुले केवळ यशस्वी नव्हे, तर संवेदनशील आणि जबाबदार नागरिक होतात.



**अमळनेर : मराठा वाड्:मय मंडळ, आप्पासाहेब प्रा. र. का. केले सार्वजनिक ग्रंथालय व मोफत वाचनालयातर्फे आयोजित शारदीय व्याख्यानमालेंतर्गत मराठा मंगल कार्यालयात गुरुवारी ' आनंदी पालकत्व ' (सकारात्मक दृष्टिकोन) या विषयावर चतुर्थ पुष्प गुंफताना डावीकडून वरणगाव येथील मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राहुल भोईटे. शेजारी सुपरिचित समुपदेशक इंजि. सुधीरकुमार वाघुळदे. (छायाचित्र : भरत पाटील)**

### आनंदी पालकत्वाचे मूलमंत्र

- **प्रेमळ संवाद :** मुलांशी दररोज प्रेमपूर्वक आणि खुलेपणाने संवाद साधला गेला तर त्यांच्यात निश्चितपणे विश्वास निर्माण होतो.
- **ऐकण्याची मानसिकता :** मुलांचे म्हणणे समजून घेऊन त्यांच्यातील नेमकेपणा गंभीरपणे स्वीकारणे हे त्यांच्या भावनिक विकासासाठी आवश्यक आहे.
- **कौतुकाची थाप :** मुलांच्या प्रयत्नांचे सतत कौतुक केल्यास ते अधिक आत्मविश्वासपूर्ण वागतात.
- **शिस्तीसाठी शिक्षा नको :** चुकीच्या अथवा न पटणाऱ्या वागणुकीसाठी कठोर शिक्षा करण्याऐवजी त्यांना ते का आणि कसे चुकीचे आहे? हे समजावून सांगण्यावर भर असावा.
- **स्वत:चा सकारात्मक दृष्टिकोन :** पालकांनी नेहमी स्वतः आनंदी आणि सकारात्मक राहून मुलांवर प्रभाव टाकावा.

पान १ वरून

### श्री मंगळग्रह मंदिरात अनुभवली सकारात्मक ऊर्जा

जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी प्रा. सोमण म्हणाले, की लवकरच अर्थात २९ सप्टेंबर रोजी ' अभंग तुकाराम ' हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. त्यानंतर पुढच्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'आग्राहून सुटका' हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. त्याची शुटींग प्रगतीपथावर आहे. आजवरची माझी यशस्वी कारकीर्द खऱ्या अर्थाने परमेश्वराचीच कृपा म्हणावी लागेल. या संपूर्ण कारकिर्दीत ' लिमिटेड माणुसकी', 'दृश्यम'मधील इन्स्पेक्टर विनायक सावंतांची भूमिका, 'फास्टर फेणे', 'येरे येरे पैसा', 'लागी तो छगी', ' वेगळी वाट' या चित्रपटांमधील भूमिका प्रेक्षकांना विशेष भावल्या आहेत.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

## अमळनेर आगारातील लालपरीची बेशिस्त पार्किंग; प्रवाशांची तारांबळ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बाहेरगावी जाण्यासाठी स्थानकात आल्यावर बहुतांश प्रवाशी हे बस थांबत असलेल्या फलाटासमोर उभे राहत असतात. मात्र, अमळनेर आगारातील बहुतांश चालक हे फलाटासमोर बस उभी न करता, आगारात इतरत्र ठिकाणी बसेस उभ्या करत असल्यामुळे प्रवाशांचा चांगलाच गोंधळ उडत आहे. नियोजित फलाटावर लागणारी बस इतर ठिकाणी लागल्यामुळे प्रवाशांना धावपळ करून बस पकडावी लागत आहे. अमळनेर आगारात गेल्या अनेक दिवसापासून हा प्रकार सुरू असल्यामुळे आगार प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

अमळनेर आगारात पहाटे पासून ते रात्री उशिरापर्यंत प्रवाशांची वर्दळ सुरू असते. प्रवाशांची बस पकडताना गैरसोय होऊ नये, म्हणून आगारात ठिकठिकाणी फलाट उभारण्यात आले असून, फलाटासमोर गावांची नावेही लिहिली आहेत. ज्यामुळे प्रवाशांना बस तत्काळ बस पकडणे सोयीचे आहे. मात्र, आगारातील बहुतांश चालक हे, फलाटावर बसेस उभी न करता आगारात इतरत्र कुठेही बसेस उभी करत आहेत. यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे बाहेरगावाहून येणाऱ्या बसेसवरील चालकही कुठेही बस उभी करत आहेत. ज्या वेळी संबंधित गावाची बस लागल्याची उद्घोषणा होते. त्यावेळी मात्र प्रवाशांना बस शोधण्यापासून ते पकडण्यापर्यंत चांगलीच कसरत करावी लागत आहे. यामुळे महिला व वयोवृद्ध प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून, बसच्या दरवाजाजवळ एकच गोंधळ उडत आहे. या प्रकारामुळे अनेकदा वादाच्यादेखील घटना घडल्या आहेत. असे असतानाही आगारामध्ये अद्यापही फलाटावर बसेस लागत नसून, बोटावर मोजण्याइतकेच चालक नियमाप्रमाणे फलाटावर बस लावत आहेत.असल्यामुळे आगार प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

## 'जि. प. निवडणुकीत चक्रानुक्रमे आरक्षण नाही'

### सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समिती निवडणुकांमध्ये चक्रानुक्रमे (आळीपाळीने) आरक्षण देण्याच्या नियमाच्या आधारे आरक्षण निश्चित करावे, अशी मागणी करणाऱ्या विशेष अनुमती याचिकांची दखल घेण्यास आणि त्या आधारे निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचे न्या. सूर्यकांत, न्या. उज्वल भुयान व न्या. एन. के. सिंग यांच्या खंडपीठाने गुरुवारी नकार दिला. त्यामुळे राज्य शासनाने नव्याने केलेल्या नियमानुसारच आरक्षण निश्चित होणार आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्ग या संवर्गांना आरक्षण देण्याचे नियम राज्य शासनाने १९९६ मध्ये तयार केले. त्या आधारे १९९७, २००२, २००७, २०१२ व २०१७ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात आल्या. प्रत्येक निवडणुकीमध्ये एखाद्या गटाला अथवा गणाला आरक्षण देताना यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये त्याच संवर्गासाठी आरक्षण दिले होते का हे तपासण्यात येते आणि चक्राणुक्रमे किंवा आळीपाळीने ते वेगवेगळ्या संवर्गांना देण्यात येते. त्यामुळे कोणताही गट किंवा गण कायम आरक्षित किंवा

### प्रलंबित निवडणूक होणे आवश्यक!

सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिकेवर कोणतेही आदेश देण्यास व निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे यासंदर्भातील काही मुद्दे जर उपस्थित झाले तर या निवडणुकीनंतर त्याचा विचार करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत आता प्रलंबित निवडणूक होणे आवश्यक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाच्या जळगाव जिल्हा उपप्रमुखपदी नितीन निळे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या जळगाव जिल्हा उपप्रमुखपदी येथील ज्येष्ठ पदाधिकारी नितीन सुभाष निळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने संपर्कप्रमुख संजय सावंत व उपनेते तथा राज्याचे पाणीपुरवठामंत्री गुलाबराव वाघ यांच्या मार्गदर्शनात जळगाव जिल्हाप्रमुख कुलभूषण पाटील यांनी त्यांची नियुक्ती केली आहे. नितीन निळे हे विद्यार्थी दशेपासून शिवसेनेत सक्रिय आहेत, यापूर्वी त्यांनी भारतीय विद्यार्थी सेना शहरप्रमुख जिल्हाप्रमुख शिवसेना अमळनेर शहर प्रमुख आदी पदांवर उत्तम काम केले आहे.


### डिजिटल पत्राने कृपया अवश्य अभिप्राय द्या

*एकेकाळी पोस्टल पत्रांचा प्रचंड बोलबाला होता. भावभावनांचे, निमंत्रणांचे, सुख- दुःखाच्या वार्तांचे, सर्व प्रकारच्या व्यवहारांची देवाण-घेवाण शक्यतो पोस्टल पत्रानेच होत होती . " माझ्या मामाचे पत्र हरवले " असे म्हणत बालपणाचा आनंद आणि सुखद अनुभव आपण सर्वांनीच घेतला आहे. आता मात्र ते मामाचे पत्र जणू कायमचेच हरवले आहे. या पार्श्वभूमीवरही आपण डिजिटल पत्राने अर्थात व्हॉट्सअॅपने ग्लोबल महातेज मधील बातम्या व लेख यासंदर्भातील अभिप्राय कृपया अवश्य पाठवा. आमच्यासाठी ते मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल.*

*धन्यवाद .*

### विनम्र आवाहन

नवरात्रोत्सवानिमित्त आपल्याकडील घट, आरास, पूजा-विधींची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी त्यांचे फोटो तसेच नवरात्रोत्सवानिमित्त आपल्याकडील काही पारंपारिक, दीर्घकालीन प्रथा, व्रत-वैकल्ये, उपक्रम आदींचीही माहिती आम्हांस या **7711004040 व 7711004242** क्रमांकावर पाठवा.

***संपादक, दै. ग्लोबल महातेज***


## शहापूरमधून १०, ढेकू येथून ४ जनावरे रात्रीतून चोरीला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील दोन गावांतून १४ पशुधनांची चोरी झाल्याने शेतकऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. त्यात शहापूर येथून दहा जनावरे व ढेकू बुद्रुक येथून चार जनावरे चोरीस गेली आहेत. त्यामुळे पशुपालकांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

मारवड पोलीस ठाण्यात अज्ञान व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. शहापूर-वासरे गावाबाहेरील गोठ्यांमधून अज्ञात चोरट्यांनी दहा जनावरे चोरून नेली आहेत. या घटनेत अरुण दामू पाटील यांची एक गाय व दोन वासरे, दिनेश पाटील यांची एक गाय व एक वासरू, शांताराम पाटील यांच्या दोन गायी व एक वासरू, अरुण पाटील यांचा बैल चोरीस गेले आहेत. याबाबत सीसीटीव्हीवरून शोध सुरू आहे. ढेकू बुद्रुक येथील प्रवीण दिलीप पाटील यांची बैलजोडी व अनिल प्रकाश पाटील यांची म्हैस रात्री एक ते तीनच्या सुमारास चोरीस गेली आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच मारवड पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून, ज्या गावांतून पशुधन चोरी झाली त्या गावांतील सीसीटीव्ही व विविध रस्त्यांवर जाणाऱ्या वाहनांचे सीसीटीव्ही चित्रण तपासून चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

दरम्यान गोवंश हत्येविरूद्ध कडक कायदे असूनही अनेक ठिकाणाहून गोवंश चोरून त्यांची रवानगी थेट कत्तलखान्यात होत असल्याने ही निव्वळ चोरी नसून भावना दुखवणारा प्रकार असल्याचे काहींनी सांगितले.

## पत्रकारांची स्थिती हलाखीची : अनिल म्हस्के

**ग्लोबाल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : "पत्रकार हा समाजाचा चौथा स्तंभ मानला जातो; मात्र पत्रकारांची अवस्था आजही हालाखीचीच आहे. पत्रकारांच्या हक्कांसाठी आपण सर्वांनी एकत्र यायला हवे, नाहीतर परिस्थिती आणखी बिकट होईल," असे प्रतिपादन व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी केले. अमळनेर येथील श्री मंगळ ग्रह सेवा संस्था या ठिकाणी आयोजित व्हॉईस ऑफ मीडिया केडर कॅम्प प्रसंगी ते बोलत होते. म्हस्के यांनी सांगितले की, व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेची स्थापना प्रतिकूल परिस्थितीत झाली. गेल्या काही वर्षांत पत्रकारितेत मोठे बदल झाले, पण पत्रकारांची परिस्थिती मात्र सुधारली नाही. गावच्या सरपंचापासून ते देशाच्या पंतप्रधानापर्यंत अनेक नेतृत्व घडवणारा पत्रकार स्वतः घरकुलासाठी झगडतो. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून गौरवले जात असूनही पत्रकाराच्या जीवनात अंधारच आहे. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटली, तरीही पत्रकाराची खरी व्याख्या समजली गेली नाही, हे दुर्दैवी असल्याचे त्यांनी नमूद केले. पत्रकारांच्या महामंडळासाठी दोन वर्षांपासून सुरू असलेला लढा अद्यापही न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेने पत्रकारांच्या घरकुलाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील कॅम्पपासून सुरुवात केली. तेथे पत्रकारांना दहा लाख रुपयांचा विमा संरक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. आज संघटनेची व्याप्ती महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापासून देशभर पसरून थेट ५६ देशांपर्यंत पोहोचली आहे. मात्र, पत्रकारांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढत आहेत. कायद्यात तरतुदी असतानाही अद्याप एकाही घटनेत गुन्हा नोंदवला गेला नाही, हे गंभीर वास्तव असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांच्या प्रश्नांसाठी लढणारी खरी ताकद म्हणजे व्हॉईस ऑफ मीडिया आहे. या संघटनेमुळेच पत्रकारांच्या हक्कांच्या लढ्याला बळ मिळत आहे, असे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी ठामपणे सांगितले.




### तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?


**ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत.** खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : **8788441234**
योगेश महाजन : **7588813540**
भरत पाटील : **9922408434**

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: **9922547800**
रजनीकांत पाटील : **8788441234**


## पैलवान पवन शिंपी याची राष्ट्रीय स्पर्धेत निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा :**



अमळनेर : शालेय ज्युडो स्पर्धेत ८१ किलो वजनी गटात पवन शिंपी या पैलवानाने बाजी मारल्याने त्याची निवड पंजाब येथे होणाऱ्या ऑल इंडिया ज्युडो स्पर्धेत झाली आहे. पवन हा माजी नगरसेवक प्रताप शिंपी यांचा चिरंजीव आहे.

पवन हा प्रताप महाविद्यालयात तृतिय वर्षाचे शिक्षण घेत असून झालेल्या शालेय स्तरावरील स्पर्धेत त्याने तीन राऊंड विजयी सलामी देऊन विजय मिळविला. त्याची पंजाब नॅशनल ज्युडो स्पर्धेसाठी निवड झाली. त्याबद्दल अमळनेर तालुका कुस्तीगीर संघ, राजे शिवाजी मित्र मंडळ, जय हिंद व्यायाम शाळा, तसेच प्रताप आबा मित्र परिवाराकडून पवनवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पवन मुळे अमळनेरला कुस्ती व ज्युडो क्षेत्रात अनेक बहुमान मिळाले आहेत.

## व्हॉईस ऑफ मीडियाच्या जिल्हा सोशल मीडिया प्रमुखपदी बापूराव ठाकरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : आंतरराष्ट्रीय दर्जाची, ५६ देशांत कार्यरत असलेल्या ख्यातनाम व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेच्या जळगाव जिल्हा सोशल मीडिया प्रमुखपदी येथील पत्रकार बापूराव आनंदराव ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बापूराव ठाकरे पत्रकारांच्या आणि पत्रकारितेच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार आहेत. त्यांच्यावर जळगाव जिल्हाध्यक्ष कल्पेश विजय महाले यांनी ही जबाबदारी टाकली आहे. या नियुक्तीबद्दल ठाकरे यांनी राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले, प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले, नाशिक विभागीय अध्यक्ष मिलिंद टोके, जळगाव जिल्हाध्यक्ष कल्पेश महाले, साप्ताहिक विंगचे जळगाव जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष पंकज पाटील ( रावेर), अमळनेर तालुकाध्यक्ष उमेश काटे, जिल्हा संघटक जयेश काटे, शहराध्यक्ष जयवंत वानखेडे व सर्व सदस्यांचे आभार मानले आहेत. सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.




# ॐ हा जप का करावा?

## मंत्राचे रहस्य काय.....?

**मंत्र म्हणजे काय?**

मनावर नियंत्रण करुन शब्दाचे उच्चारण करण्याच्या क्रियेला आपण मंत्र म्हणतो. मंत्राचा सर्वात जास्त प्रभाव आपल्या तन आणि मनावर पडतो. मंत्र जप ही एक मानसिक क्रिया आहे.असे म्हटले जाते की जसे असेल मन तसे असेल तन!

जर आपण मानसिक रूपाने स्वस्थ्य असु तरच आपले शरीर ही स्वस्थ्य असते. मन स्वस्थ ठेवण्यासाठी मंत्राचा जाप करणे फार आवश्यक आहे.

### ॐ हा तीन अक्षरानी बनलेला आहे.

अ, उ आणि म ने निर्मित हा शब्द सर्व शक्तिमान आहे. जीवन जगण्याची शक्ति आणि संसार आव्हानाचा सामना करण्याचा अगम्य साहस देणारा ॐ ओम् उच्चारण करण्याने विभिन्न प्रकारच्या समस्या व व्याधिंचा नाश होतो.

सृष्टीच्या आरंभी एक ध्वनि झाला तो म्हणजे ॐ आणि पुर्ण ब्रह्माण्डात हा ध्वनी पसरला आणि याच ध्वनीव्दारे भगवान शिव, विष्णु आणि ब्रह्मा प्रकट झाले. म्हणून ॐ हा सर्व मंत्राचा बीज मंत्र आणि ध्वनि व शब्दाचा निर्माता म्हटले आहे.असे म्हटले जाते की ॐ च्या नियमित उच्चाराने आपल्या शरीरातील आत्मा जागृत होतो आणि सर्व रोग व तणावा पासून मुक्त होतो म्हणून आपले साधु संत सद्गुरु ॐ होण्यास सांगत असतात. तसेच अनेक वास्तू तज्ञ सांगतात की घरात ॐ चा उच्चार करत राहिल्यास घरातील वास्तु दोष नष्ट होतो.

ॐ मंत्राला ब्रम्हांडाचे स्वरूप मानले आहे. असे मानले जाते की ॐ मध्ये त्रिदेवाचा वास आहे. म्हणून मंत्राच्या अगोदर ॐ चे उच्चारण केले जाते. जसे...

**॥ ॐ नमो भगवते वासुदेव॥ किंवा**
**॥ॐ नमः शिवाय।**

आध्यात्मिक दृष्टीने असे मानले जाते की ॐ चा जाप करत राहिले तर मन शांत आणि शुध्द होते आणि मानसिक शांति प्राप्त होते. ॐ मंत्राच्या जपाने मनुष्य ईश्वराच्या फार जवळ जातो. ॐ हेच ईश्वराचे खरे नाव आहे. योग दर्शनात हे स्पष्ट आहे की हा ॐ शब्द तीन अक्षरानी मिळुन बनला आहे.

-अ, उ, म. प्रत्येक अक्षर ईश्वराच्या वेगवेगळ्या नावाना आपल्यात सामावून घेतले आहे.जसे "अ" ने व्यापक, सर्वदेशीय, आणि उपासना करण्या योग्य आहे. "उ" ने बुद्धिमान, सूक्ष्म, सर्व चांगल्या तत्वाचे मूल आणि नियम करणारा आहे.
"म" ने अनंत, अमर, ज्ञानवान, आणि पालन करणारा,हे फार सुक्ष्म उदाहरण दिले आहे.तसे बघितले तर ॐ प्रत्येक अक्षराने समजू शकतो वास्तवात अनंत ईश्वराचे अनगिणत नावे केवळ या ॐ शब्दातच येतात...
१) बराच काळ ॐ चे उच्चारण केल्यास पूर्ण शरीर तणावरहित होते. २) जर आपणास भिती वाटत असेल, घबराट होत असेल, अंग थरथरत असेल तेव्हा ॐ चे उच्चारण करीत राहिल्यास पटकन फरक पडतो. ३) नित्य ॐ च्या उच्चाराने शरीरातील विषारी तत्वे नष्ट होतात, शरीर आरोग्यदायी बनते, स्वस्थ बनते.
४) यामुळे हृदय आणि रक्त प्रवाह संतुलित होतो. पाचन शक्ति सुधारते. ५) यामुळे शरीरात स्फूर्तीचा संचार होतो. ६) थकव्या पासून वाचण्यासाठी हा फार चांगला उपाय आहे. ७) झोप येत नसेल, अनिद्रेचा त्रास असेल तर ॐच्या उच्चाराणे जाते. रात्री झोपताना झोप येई पर्यत ॐ चा उच्चार करावा आपोआप न कळत झोप लागते. ८) काही विशेष प्राणायाम करताना ॐ चा उच्चार केल्यास फुफ्फुसा मध्ये बळ येते.
असे अनगिणत उपाय आहेत.

### ॐ उच्चारण हे आत्म्याचे संगीत आहे.

ॐ हे चिन्ह अद्भुत आहे. हे संपूर्ण ब्रह्मांडाचे प्रतीक आहे. ब्रह्म चा अर्थ विस्तार, पसारा, पारणे. ॐ हे अनादि आणि अनंत व निर्वाणाच्या अवस्थेचे प्रतीक आहे. हा प्रणव मंत्र आहे. हा मंत्राचा प्रारंभ आहे अंत नाही.हा ब्रह्मांडाचा अनाहत ध्वनि आहे. अनाहत अर्थात दोन गोष्टी एकमेकांवर टकरणे होय. दोन गोष्टी एकमेकांना टकरणे त्याचा जो ध्वनी होतो, तो हा अनावर ध्वनी नाही. पण संपूर्ण ब्रह्मांडात हा ध्वनी चालू आहे. तपस्वी आणि ध्यान करणारे जेव्हा ध्यानाच्या खोल अवस्थेत जातात तेव्हा त्यांना हा ॐ चा ध्वनी ऐकु येतो. हा ध्वनी या जगात सर्वत्र चालू आहे. फक्त आपली ऐकण्याची क्षमता पाहिजे. हा ध्वनी ध्यानात ऐकू येऊ लागल्यास मन आणि आत्मा शांती अनुभवू लागतो. साधारण मनुष्य हा ध्वनि ऐकू शकत नाही. मात्र जो कोणी नेहमी ॐ चे उच्चारण करत असेल त्याच्या आसपास सकारात्मक ऊर्जेचा विकास होऊ लागतो. हा ध्वनी ऐकण्यासाठी पूर्णतः मौन आणि ध्यानात असणे महत्त्वाचे आहे.जो हा ध्वनि ऐकू लागतो त्याचे परमेश्वराशी नाते बनू लागते.

**उच्चारण विधि :** सकाळी लवकर उठून पवित्र होऊन ॐ ध्वनीचे उच्चारण करावे. उच्चारण करताना पद्मासन, अर्धपद्मासन, सुखासन, वज्रासनात बसून याचे उच्चारण ५,७,१०,२१,१०८ वेळा करावे.

ॐ मोठया आवाजात ही म्हणू शकता व हळुहळू म्हणू शकता.ॐ चा जप माळेवर ही करु शकता.

**होणारे लाभ : अशी मान्यता आहे की** ॐ मुळे शरीर आणि मन एकाग्र होण्यास मदत होते. हृदय व रक्तसंचार व्यवस्थित होतो. मानसिक आजार बरे होतात. काम करण्याची शक्ति वाढते. प्रिय व अप्रिय शब्दाचे ध्वनि काढल्याने श्रोता आणि वक्ता दोघांनाही हर्ष, विषाद, क्रोध, घृणा, भय व कामेच्छेचा आवेग येऊ शकतो.अप्रिय शब्दातून निघणारा ध्वनी आपल्या मस्तिष्कात काम, क्रोध, मोह, भय लोभाची भावना उत्पन्न करतो त्यामुळे हृदय व रक्तसंचारावर परिणाम होतो. ह्याचे धडकणे वाढते त्यामुळे रक्तात 'टॉक्सिक' पदार्थ निर्माण होतात. हे सारे काही ॐ मुळे नष्ट होऊ शकते.

## मंगल नवरात्रोत्सव-२०२५






मंगळ ग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळ ग्रह मंदिरात दरवर्षी नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील महिला मंडळाकडून मंगलेश्वरी भूमी मातेची मंगल आरती केली जाते गुरुवारी संध्याकाळी पती देवांसह मंगल आरती करताना लाड शाखीय वाणी समाजाच्या महिल मंडळाच्या सौ. वनिताताई मंगेश महिंद, सौ. स्मिताताई दत्तात्रय शिरोडे तर शेवटच्या छायाचित्रात सौ. हर्षदाताई पुष्पक शिरोडे





अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षी शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील महिला मंडळाकडून मंगळेश्वरी भूमीमातेची मंगल आरती केली जाते. शुक्रवार सकाळी पतीदेवांसह मंगल आरती करताना नारीशक्ती महिला मंडळाच्या सदस्या सौ. वैशालीताई लक्ष्मण महाजन, सौ. रेखाताई वाल्मिक मराठे शेवटच्या छायाचित्रात सौ. ज्योतीताई सुधाकर देशमुख






मंगळ ग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळ ग्रह मंदिरात दरवर्षी नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील महिला मंडळाकडून मंगलेश्वरी भूमी मातेची मंगल आरती केली जाते. शुक्रवारी संध्याकाळी पती देवांसह मंगल आरती करताना आधार बहुउद्देशिय संस्थेच्या सौ. भावनाताई भूषण सूर्यवंशी, सौ आश्विनीताई जगदीश भदाणे, सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या सौ. कीर्तीताई विकास शेलकर, सौ कविताताई शरद पाटील.







*अमळनेर : संभाजी भिडे गुरूजी प्रणीत शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संचलित जय बजरंग मंडळ पानखिडकी यांच्या तर्फे धर्म जागृतीच्या उद्देशाने आयोजित 'श्री दुर्गा माता दौड'ला गुरुवारी पहाटे पाचला पानखिडकीपासून प्रारंभ झाला. येथून दुर्गा दौडला प्रारंभ झाला. जयभावानी मित्र मंडळ, श्री सप्तश्रृंगी माता मंदिर, रामदेवजी बाबा मंदिर झामी चौक, श्रीकृष्ण मंदिर, श्री दुर्गा माता मंदिर, श्रीराम कॉलनी, हनुमान नगर, साईबाबा मंदिर येथे आरत्या झाल्या. यावेळी दौड चे ठिकठिकाणी आतषबाजी, पुष्पवृष्टी तसेच रांगोळ्यांनी स्वागत करण्यात आले (छायाचित्रे : नितेश बारी)*

# ललितापंचक स्तोत्र (प्राकृत)

स्मरे सकाळी ललितेच्या मी कमलासम वदना । विशाल मोती चमके नाकी अरूण वर्ण अधरा ।। कुंडल मणि ते रमते कानी नयने भिडती ज्या । सुंदर भाली तिलक कस्तुरी मंदस्मित ते मुखा
!!१!!
भजे सकाळी ललितेच्या मी कर कल्पलताला । झळके जेथे अंगठी, भरले कर पल्लवा ।। बाहू शोभती माणिक आणि सुवर्ण वलयामुळे । पुंड्रक धनु करी पुष्पबाण ते अंकुशही जेथे॥२॥
नमे सकाळी ललितेच्या मी कमलरुप चरणा । भक्त कामना पुरवुनी जे हो भवसागर नौका॥ ब्रम्हादिक जे सुर नायकही पूज्य मानिती ज्याला । ध्वज अंकुश ही पद्मचक्र ती अमित लांछने ज्याला॥३॥
स्तवे सकाळी परमहितैषि, याच भवानी ललितेला । महती वर्णिली वेदांनी मिती करुणामय निर्मला ॥ विद्येश्वरी परी अगम्य राही मन वाणी वेदा । विधीनिर्मिती स्थिती



विलयासी मूळ कारणीभूता!!४!!
कमला किंवा महेश्वरी वा अथवा कामेश्वरी । जगज्जननी वा त्रिपुरसुंदरी तसेच श्री शांभवी ॥ परा शक्ती वा वाणी देवी अशा रितीने हे ललिते । आवाहन मी करित सकाळी तुजसि पुण्य नामे!!५!!
सुभगदायी आनंदमयी हे स्तोत्र पंचश्लोकी । म्हणुनी प्रभाती जो नर प्रार्थी ललिता मातेशी ॥ प्रसन्न होवून त्वरीत तया ती दे विद्या लक्ष्मी ।अनंत किर्ति तशीच होई विमल सुखा वृद्धी॥६॥
(श्रीमद् आद्य शंकराचार्य यांच्या ललितपंचक स्तोत्राद्वारे )

श्री ललितेचा महामंत्र मिळणे फार कठीण आहे, तथापी भक्तांनी तळमळीने खालील ध्यानाच्या श्लोकाचे अनुसंधान करावे त्याने ही देवता प्रसन्न होईल.

चतुर्भुजे चंद्र कलां तमे कुचोन्नते कुंकुम रागशोभे । पुंड्रेषु पाशांकुश पुष्पबाण, हस्ते नमस्ते जगदेकमाता ।।
जगदंबेच्या कुंकुवाप्रमाणे लाल आहे व तिच्या मस्तकावर चंद्राची कोर आहे. चार हात असून त्यामध्ये पुंड्र्या उसाचे धनुष्य, पुष्पबाण, पाश, अंकुश अशी आयुधे आहेत याप्रमाणे अखिल विश्वास मोहित करणारे महा-भगवती ललितेचे स्वरुप आहे.

शास्त्र सांगते...!

# देवांस कोणकोणती फुले निषिद्ध

## देवांस फुले कशी वहावीत ?

निषिद्ध पुष्पांची बरीच मोठी यादी विविध धर्मग्रंथातून सांगितलेली दिसून येते. अर्थात त्यापैकी बरीच फुले हल्ली उपलब्ध होत नाहीत. पण सामान्यतः नेहमीच्या देवपूजेसाठी ठळकपणे खालील फुले त्या त्या देवांसाठी निषिद्ध मानली जातात.

शंकरास केवडा, बकुळीची व कुंदाची फुले वहात नाहीत. काही ठिकाणी तुळस निषिद्ध मानली जाते. पण त्यास शास्त्राधार नाही. शालीग्रामावर वाहिलेली तुळस शंकरास अतिप्रिय असते. गणपतीस तुळस चालत नाही. पण गणेश चतुर्थीस श्वेततुळस वहावी. पितरांस (श्राद्धादिवशी) तांबडी फुले चालत नाहीत. देवीला दुर्वा चालत नाहीत. पण चण्डीहोमास दूर्वा आवश्यक आहेत. विष्णूपुजेस बेल वापरला जात नाही.

सामान्यतः शिळी फुले देवास निषिद्ध ठरतात. पण शास्त्रात प्रत्येक फुलापानांचा पर्युषित (शिळे होण्याचा) काल निरनिराळा सांगितलेला आहे. त्यापैकी तुळस ही कधीच शिळी होत नसल्यामुळे ती सर्वदा ग्राह्य आहे. बेल ३०, दर्भ ३०, चाफा ९, मोगरा ४, कण्हेर ८, शमी ६, केवडा ४, दवणा १, कमळ १, दूर्वा ८ दिवसांनी शिळ्या ठरतात.

कुजलेली, सडलेली व सच्छिद्र झालेली फुले पर्युषित समजण्याचा प्रघात आहे. देवाचे निर्माल्य काढताना तर्जनी व अंगुष्ठ या दोन बोटांचा वापर करावा. देवांस फुले वाहताना मध्यमा व अनामिका यांचा वापर करावा. कनिष्ठकेचा वापर कुठेही करू नये.



## श्रीयंत्र पूजन विधी

श्रीयंत्र पूजेच्या स्थानाव्यतिरिक्त आपल्या कपाटात, कारखान्यात किंवा अन्य महत्वपूर्ण जागी स्थापन करता येते. ज्यादिवशी श्रीयंत्र स्थापन केले जाते त्या दिवसापासून साधकाला त्याचा प्रभाव जाणवू लागतो. श्रीयंत्राची पूजा खूप सरळ आणि स्पष्ट आहे. स्नान, ध्यान करून शुद्ध पिवळे वस्त्र धारण करून पूर्व किंव उत्तर दिशेला तोंड करून, पिवळ्या किंवा पांढऱ्या आसनावर बसून पूजा करावी. आपल्या समोर चौरंग ठेवून त्यावर लाल वस्त्र टाकावे. अशी मान्यता आहे की, विवाहित व्यक्तींनी श्रीयंत्राचे पूजन सपत्नीक केल्याने सर्व सिद्धी प्राप्त होतात. श्रीयंत्रात सफलता मिळण्यासाठी गुरुपूजन आवश्यक आहे. आपल्या समोरिल चौरंगावर गुरुचित्र, विग्रह, यंत्र, पादुका स्थापित करून हात जोडून गुरुचे ध्यान करावे. यानंतर चौरंगावर तांदूळाची रास करून त्यावर एक सुपारी गणपती समजून स्थापित करावी. या गणपतीला पंचोपचार पूजन करावे. पंचोपचार म्हणजेच हळद , कुंकु, अक्षता , पुष्प. याच चौरंगावर एका तांब्याच्या पात्रात फुलांचे आसन करून त्यावर श्रीयंत्र ( तांबे किंवा पारा या स्वरूपातील ) स्थापित करावे. यानंतर एकाग्रतापूर्वक हात जोडून यंत्राचे ध्यान करावे.
दिव्या परां सुधवलारुण चक्रयातां मूलादिबिन्दु परिपूर्ण कलात्मकायाम। स्थित्यात्मिका शरधनुः सुणिपासहस्ता श्री चक्रतां परिणतां सततां नमामि॥
अशाप्रकारे श्रीयंत्राचे ध्यान करून श्रीयंत्राची प्रार्थना करावी. जर ही प्रार्थना नित्य १०८ वेळा जप केल्यास अत्यंत लाभप्रद ठरते.
धनं धान्यं धरां हर्म्यं कीर्तिर्मायुर्यशः श्रीम् । तुरगान् दन्तिनः पुत्रान् महालक्ष्मीं प्रयच्छ मे॥
ध्यानप्रार्थनानंतर श्रीयंत्रावर पुष्प अर्पित करून पुढील मंत्र म्हणावा.
ॐ मण्डूकाय नमः। ॐ कालाग्निरुद्राय नमः। ॐ मूलप्रकृत्यै नमः। ॐ आधारशक्तयै नमः। ॐ कूर्माय नमः। ॐ शेषाय नमः। ॐ वाराहाय नमः। ॐ पृथिव्यै नमः। ॐ सुधाम्बुधये नमः। ॐ रत्नद्वीपाय नमः। ॐ भैरवे नमः। ॐ नन्दनवनाय नमः। ॐ कल्पवृक्षाय नमः। ॐ विचित्रानन्दभूम्यै नमः। ॐ रत्नमन्दिराय नमः। ॐ रत्नवेदिकायै नमः। ॐ धर्मवारणाय नमः। ॐ रत्न सिंहासनाय नमः। कमळ फुलांची माळ अर्पण करावी.
लक्ष्मीबीजमंत्र पारायण केल्यास सर्वात लाभदायक असते.
लक्ष्मी बीज मंत्र
ॐ श्रीं ह्रीं श्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ॐ महालक्ष्म्यै नमः॥

